**वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार यांची पदासहित बदलीने पदस्थापना-**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ५१**
**आदेश क्र.प्राधि/बदली/२०२३ ४४१ /प्र.७**
**दिनांक :- 03 FEB 2023**

**आ दे श**

प्रशासकिय हित विचारात घेऊन श्री.संजय उरणकर, वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार, मुंबई मंडळ (गट-अ) यांची खाली दर्शविल्यानुसार पदासहित बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ क्र | अधिका-यांचे नांव व पदनाम | सद्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.संजय उरणकर,<br>वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार | मुंबई मंडळ | प्राधिकरण | पदासहित पदस्थापना |

२/- बदलीनंतर उक्त अधिकाऱ्यांना वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते अनुज्ञेय राहतील. तसेच त्यांना पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

३/- श्री.पी.डी.साळुंखे, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार यांचेकडे मुंबई मंडळ, पुणे मंडळ, कोकण मंडळ व नाशिक मंडळाकडील वास्तु विभागाशी संबंधित कामाचा कार्यभार सोपविण्यात येत आहे, व श्री. संजय उरणकर, वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार यांनी मुंबई इमारत व दुरुस्ती पुर्नरचना मंडळ, नागपूर मंडळ, अमरावती मंडळ, औरंगाबाद मंडळ व मुंबई झोपडट्टी सुधार मंडळ या मंडळाकडील वास्तु विभागाशी संबंधित कामाचा कार्यभार सोपविण्यात येत आहे.

४/- उपरोक्त अधिका-यांनी नविन पदाचा कार्यभार त्वरीत स्विकारावयाचा आहे, पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तसेच, बदली रदद करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास ते शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील, याचीही नोंद घ्यावी.

५/- उक्त अधिकाऱ्यांना तात्काळ प्रभावाने कार्यमुक्त करण्यात येत आहे. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रमुखांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे व नवीन नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ रुजू होण्यास संबंधित अधिका-यांना आदेशित करावे.

६/- बदली आदेशातील अधिकाऱ्यांना त्वरीत कार्यमुक्त न केल्यास त्यांचे वेतन मुळ विभागाच्या आस्थापनेवर काढता येणार नाही. तसेच, सदर अधिकारी यांचे वेतन मूळ विभागाच्या आस्थापनेवर काढल्यांस संबंधित विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल, याचीही नोंद घ्यावी.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे मान्यतेने**

( राजकुमार सागर )
सचिव/प्राधिकरण.

**प्रति,**
**श्री.संजय उरणकर, वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार**
**(मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांचेमार्फत.)**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मा. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ,
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८) चौकशी अधिकारी/प्रा.
९) सक्षम प्राधिकारी -१,२ /प्रा.
१०) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
११) सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ,
१२) मुख्य मा.व सं.तं.कक्ष/प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)
१३) मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ,
१४) लेखाधिकारी, प्राधिकरण
१५) संचालक, पी.डी.सी. पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**प्रत:** प्रशासकीय अधिकारी -१,२ प्राधिकरण/ मुंबई

**प्रत**: प्रशासन- ९,१०,११,१३,/प्रा.